# * <u>*CERTIFICATE*</u> *

*Shri. ANKUSH KONDIBA NIKAM has satisfactory completed his research work for M.Phil., under my supervision and guidance. He is submitting Dissertation [redacted] entitle -*

एकोणिसाव्या शतकातील मराठी कादंबरी :
"नारायणराव आणि गोदावरी" च्या
अनुषंगाने अभ्यास

*to the SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR. He has done the work which has not been carried out and submitted earlier for any degree to the best of my knowledge.*

*Karad.*

*Date :* २२ मे ८८

S. R. Patil.

*( DR. SUMAN PATIL )*
*M.A.,Ph.D.*
*GUIDE*

## * DECLARATION *

*It is hereby declared that, the work reported in this thesis is original and has not been previously submitted for any Diploma in this or any other University.*

*Date :* १६ मे १९८५

*( PROF. A. K. NIKAM )*

## " ऋणनिर्देश "

शोधनिबंधाचे काम म्हणजे एक शोधचक्र असते. यासाठी सचोटीने प्रयत्न करणे गरजेचे असते. सततचा प्रामाणिक प्रयत्न असल्याशिवाय हे जमत नाही. तसेच इतरांचे सहकार्य सुध्दा महत्वाचे असते. या कार्यात मोलाचे सहकार्य ज्यांचे मिळाले [redacted] त्यांचा ऋणनिर्देश हे एक आद्यकर्तव्य असते.

या शोधकार्यात सतत मार्गदर्शन करणाऱ्या व यास योग्य दिशा व आकार देण्याचे महत्वाचे काम करणाऱ्या मार्गदर्शक प्रा.डॉ. सुमन रा. पाटील, वेळोवेळी प्रेमळपणे मार्गदर्शन व बहुमोलाचे सहकार्य करणारे डॉ. वसंतराव घार्गेसर, यांचे ऋणाईत रहाण्यात मला आनंद आहे.

प्रा.डॉ. ल.रा. नसिराबादकर, डॉ. वि.रा. तोडकर, प्रा. मा.के. यादव, व प्रा. बी.पी. [redacted] पाटील इ. विद्वानांशी वेळोवेळी झालेल्या चर्चा, त्यांचे मार्गदर्शन व सहकार्य मोलाचे आहे. त्याचप्रमाणे स.गा.म. कॉलेजचे प्राचार्य डी.के. खोत व मराठी विभागाचे प्राध्यापक यांनी दिलेली प्रेरणा व सहकार्य यामुळे हे कार्य तडीस जाऊ शकले.

स.गा.म.कॉलेज ग्रंथालय कराड, विश्वकोश ग्रंथालय वाई, शिवाजी विद्यापीठ ग्रंथालय कोल्हापूर, विश्रामबागवाडा शासकीय ग्रंथालय व जयकर ग्रंथालय पुणे, तसेच कादंबरीची मुळ प्रत मिळवून देणारे श्री. सुरेश गोतपागर, सुबक टंकलेखन करणारे आनंद टाईपरायटिंग ब्यूरो विटा चे श्री. शशिकांत कुलकर्णी, ग्रंथाची बांधणी करणारे जिव्हाळा मुद्रणालय विटा चे मालक सौ. सी.एस.पाटील व इतर प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सहकार्य करणाऱ्या सर्वांचा मी ऋणी आहे.

# " संक्षिपसूची "

| | | |
|---|---|---|
| 0 | ना.गो. | नारायणराव आणि गोदावरी |
| 0 | पण लक्ष्यात. | पण लक्ष्यात कोण घेतो ? |
| 0 | मधली. | मधली स्थिती |
| 0 | गोदावरी. | गोदावरी अथवा सुनेचा<br>दुर्दैवी मृत्यू |
| 0 | राम-गोपाळ | रामभाऊ आणि गोपाळराव |
| 0 | यमुना. | यमुनापर्यटन |

# " अनुक्रमणिका "


| अ.नं. | विषय | पृष्ठ |
| --- | --- | --- |
| | भूमिका | १ ते २ |
| १ | एकोणिसाव्या शतकातील मराठी कादंबरी : एक वाटचाल | ३ ते २४ |
| २ | "नारायणराव आणि गोदावरी" कादंबरीच्या संविधानकाचे सौंदर्य | २५ ते ५२ |
| ३ | व्यक्तिचित्रणे | ५३ ते ८० |
| ४ | भाषाशैली | ८१ ते ९८ |
| ५ | वास्तवता व सामाजिकता | ९९ ते १२९ |
| ६ | "नारायणराव आणि गोदावरी"चे इतर साहित्यावरील परिणाम | १३० ते १४५ |
| ७ | उपसंहार | १४६ ते १४९ |
| | संदर्भसूची | १५० ते १५३ |

# " भूमिका "

एकोणिसाव्या शतकातील कालखंड हा एक सर्वांगीण संक्रमणाचा, स्थित्यंतराचा कालखंड. इंग्रजांच्या उदार आणि उदात्त धोरणाने शिक्षणप्रसार व मुद्रणकलेचा विकास झाला. सर्व क्षेत्रात पाश्चात्य शिक्षणाने नव्या विचारांचे वारे वाहू लागले. पाश्चात्य तत्वज्ञानाने शहाणे झालेले एतद्देशीय विद्वान "जे जे आपणासी ठावे / ते ते सकळांसी सांगावे / शहाणे करून सोडावे / सकळ जन //" या उद्देशाने, नव्या उत्साहाने कार्यरत राहिले. पाश्चात्यांच्या प्रगतीचे मर्म शोधताना, स्वत:च्या ज्ञानातील, समाजातील, संस्कृतीतील व धर्मातील दोष दिसू लागले. मिशनरी कार्याने ख्रिस्तमत प्रसाराची लाट आली व हिंदु धर्माला एक संकट निर्माण झाले. त्यामुळे हिंदुत्ववादी, ख्रिस्तमतवादी, अशिक्षित, सुशिक्षित, सनातनी - सुधारक असे अनेक वाद निर्माण झाले. त्याचे पडसाद तत्कालीन साहित्यात पडू लागले.

इंग्रजी विद्येच्या प्रेरणेने मराठी गद्याचा उदय झाला, आणि नियतकालीकातून अनेक विषय हाताळले गेले. इंग्रजी विद्येच्या खुल्या भांडारातून कथा, कविता, नाटक, कादंबरी इ. लेखनास प्रेरणा मिळाली. एक नवा दृष्टीकोन त्यामध्ये आला. कादंबरीच्या प्रारंभीच्या काळात इंग्रजी, संस्कृत, उर्दू मधून अनेक भाषांतरे झाली. त्यामुळे हे लेखन लक्षणीय नव्हते. परंतू याच कालखंडातील लेखनाने नवीन कादंबरी विकासाला खत-पाणी घालून प्रेरणा दिली. कादंबरी वाङ्मयाचे अग्रदूत म्हणून गाजलेले ह.ना. आपटे यांना घडविण्याचे कार्य याच कालखंडाने केले. हरिभाऊंच्या साहित्याचे परिक्षण, विविध विवेचन विपुल झाले, पण त्यांना घडविणा-या लेखनास उपेक्षित रहावे लागले.

बाबा पद्मनजी, लक्ष्मणशास्त्री हळबे, ना.स. रिसबुड, वि.को.ओक, म.वि. रहाळकर इ. मान्यवर मंडळीच्या कलाकृती लक्षणीय आहेत. सामाजिक कादंबरीच्या क्षेत्रात बाबा पद्मनजी चे पहिले पाऊल असले तरी त्यास धर्मप्रसाराचे गालबोट लागले. त्यामुळे त्यांचे लेखन उपेक्षिले गेले.

हिंदु धर्मात राहून हिंदु धर्मातील जुन्या रुढी, बंधने, चालीरिती दूर करण्याच्या उद्देशाने त्या काळात कार्य करणारा पक्ष पुढे आला. हिंदु धर्मात राहून नव्या विचाराने प्रेरित होऊन म.वि. रहाळकरांनी लेखन केले. अद्भुतरम्य लेखनाला फाटा देऊन वास्तववादी विचारसरणीने त्यांनी आपली कलाकृती तयार केली. पण हरिभाऊंच्या तेजाआड ही कलाकृती लपून राहिली. गं.दे. खानोलकर, श्री.कृ. कोल्हटकर, नरहर कुरुंदकर, ल.म. भिंगारे, कुसुमावती देशपांडे, ल.रा. नसिराबादकर, सरस्वती पुरंदरे, प्र.धों. गुमास्ते, कलिका देशपांडे इ.नी या लेखनाची आपल्या ग्रंथामध्ये दखल घेतली असली तरी ती अल्प व परिचयात्मक आहे. सांगोपांग विवेचन कोठेही नाही.

अद्भुत आणि वास्तवाच्या सीमेवरील, हरिभाऊपूर्व कालीन, नव्या व जुन्या संधिकाळातील या कलाकृतीचा सांगोपांग अभ्यास हा या प्रबंधाचा हेतू आहे. त्या काळातील सामाजिक, सांस्कृतिक दृष्टीकोनातून, त्या काळाच्या अनुषंगाने कादंबरीचे कथानक, स्वभावलेखन, वातावरण, भाषाशैली इ.चा अभ्यास, कादंबरीतील सामाजिकता-वास्तवता आणि इतर साहित्यावरील परिणाम यांचा अभ्यास एकूण सात प्रकरणात विभागला आहे.